P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०३/११/२०२२

## दि.०२/११/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव एम आय डी सी २५३/२०२२ भा.द.वि.क ३८५,४४७,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/११/२०२२ रोजी दु.१२.४० ते ०२.०० वा.चे सुमारास मौजे बधलवाडी नवलाख उंब्रे ता.मावळ जि.पुणे गावचे हद्दीतील बेकर ह्युज कंपनीत |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/११/२०२२ रोजी २१.११ वा. |
| फिर्यादी | :- | स्वप्नील नानासाहेब पवार वय.३५ वर्षे धंदा फॅसिलीटी मॅनेजर रा.यमुनानगर निगडी |
| आरोपी | :- | १) राजेंद्र कडलग २) ओमकार कोयते दोन्ही रा.नवलाख उंब्रे ता.मावळ जि.पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपसात संगणमत करुन बेकायदेशिरपणे फिर्यादीच्या बेकर ह्युज या कंपनीत येवून फिर्यादी ला कंपनी मध्ये वेगवेगळ्या कॉन्ट्रॅक्ट द्या नाहीतर माथाडीचे काम म्हणून आम्हाला पैसे द्यावे लागतील नाहीतर कोणतीही गाडी आत बाहेर करु देणार नाही अशी धमकी देवून पार्कींग मधील गाड्यांच्या ड्रायव्हर व लोकांना शिवीगाळ करुन धमक्या दिल्या म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि चव्हाण ९३०७००७१३७ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी १०४६/२०२२ भा.दं.वि. कलम- ३५४ ड,५०९, ५०४, ५०६ माहिती तंत्रज्ञान आधिनियम २००८ चे कलम ६७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/११/२०२२ वेळ १८/३० रोजी ठिकाण-श्री साईराम पी जी बावधन |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/११/२०२२ रोजी ०२.०० वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने फिर्यादी या श्री साईराम पी जी बावधन येथे असताना फिर्यादीला त्यांचे इनस्ट्राग्राम अंकाउट वर प्रपोज केला त्यानंतर फिर्यादीने त्यास व्ही शिक्षण घेण्यासाठी आली आहे असे म्हणुन नकार दिला. त्यानंतर त्यानी फियादीला त्यांचे इनस्ट्राग्राम अकाउटवरुन वाईट वाईट व अश्लील शिवीगाळ केली त्यामुळे फिर्यादीचे मनामध्ये लज्जा उत्पन्न झाली व त्यानंतर फिर्यादी खुप घाबरले होते. त्यामुळे फिर्यादीने सदर तिचा मोठा भाउ यांस त्यांचे मोबाईल फोन वर सांगितले त्यांने फिर्यादीला सदर मुलगा यांचा नंबर मागितला असता फिर्यादीने आरोपीचा मोबाईल नंबर दिला. त्यानंतर त्याने फिर्यादीचे भावास शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी यांने त्यांचे मोबाईल वरुन फिर्यादीचे मोबाईल वर फोन करुन तुला काही कळते का तु तुझे हया गोष्टी घरी कश्याला सांगितले असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केली तसेच मी तुझे व्हिडीओ बनवेल व कॉलेज मध्ये तुझी बदनामी करेल अशी धमकी दिली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोउपनि बोरकर ९५५२११३१०० |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ८८५/२०२२ भा.द.वि कलम ४९८(अ),३२३,५०४,५०७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०१६ पासुन आतापर्यंत फिर्यादी यांचे राहते घरीन्यु गुलाब नगर दापोडी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/११/२०२२ रोजी २०.०४ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)सासु वय ४६ वर्षे २)दिरनामे आजिंक्य आनद कांबळे २५ वर्षे ३)पती नामे अक्षय आंदन कांबळे वय २८ वर्षे रा. न्यु गुलाब नगर दापोडी, पुणे |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे पती ,सासु ,दिर हे घरगुती कारणावरुन शिवीगाळ करुन तसेच फिर्यादी यांची सासु तुला मुलबाळ होत नाही तु वांझोटी आहे असे बोलुन फिर्यादी यांचा मानसिक छळ करुन अपमानीत करीत होते. त्यानंतर फिर्यादी यांना लग्नामध्ये पतीने अदांजे एक लाख रुपयाचे केलेले सोन्याचे दागीने फिर्यादी यांना न विचारता चिंचवड येथे गहाण ठेवले असुन त्यातील काही दागीने विकुन पैसे घेवुन परस्पर खर्च करून फिर्यादी यांना वारंवार शिवीगाळ, मारहान करुन धमकी देवुन फिर्यादी यांचा शारिरीक मानसिक व आर्थीक छळ केला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ बुढे ७५८८९१०२५७ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ८८४/२०२२ भा.दं. वि. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/१०/२०२२ रोजी २२/३ वा. ते दि. ०२/११/२०२२ रोजी १०/०० वा. चे के/ऑफ नरहरी लांडगे यांचा फ्लॅट नंबर १०३, निलीमा अर्पा. शितळादेवी मंदीराजवळ, कासारवाडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०२/११/२०२२ रोजी १५.५३ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांचे फ्लॅट/घर हे दरवाजाला कुलूप लावुन बंद केले असताना कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी सहाय्याने फ्लॅटच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडुन घरामध्ये प्रवेश करुन ६३,०००/- रू किमतीचे रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने फिर्यादी यांचे संमती शिवाय चोरुन नेली आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पासलकर ८६६९२८४९८९ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ६४०/२०२२ भा.द.वि.कलम ३७९. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/१०/२०२२ रोजी २२/०० वा. ते दि.३१/१०/२०२२ रोजी ०९/०० वा. चे दरम्यान तुळजा भवानी कॅन्टींन समोर, एमआयडीसी भोसरी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०२/११/२०२२ रोजी १७/३५ वा. |
| फिर्यादी | :- | भिमराव आण्णा विटकर वय २८ वर्षे धंदाकॅन्टींग रा. सिमा साबळे यांचे आफीस पाठीमागे, बालाजी नगरएमआयडीसी भोसरी पुणे. |

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची ४०,०००/- रू किंमतीची मोटार सायकल एम एच १४ एच एक्स २८६५ ही लॉक करुन पार्क करुन ठेवली असताना कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करुन चोरुन नेले आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पांचाळ ८९२८३७६१००

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चाकण १६९४/२०२२ भा.द.वि कलम २७९,३३७,४२७ ,३०४(२),मो वा का क १८४, १३४/१७७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०२/११/२०२२ रोजी ०५/१५ वा चे सुमारास मोजे चाकण गावचे हद्दीत आस्था हॉस्पिटल समोरील डिव्हायडरच्या ठिकाणी पांचाली हॉटेल जवळ तळेगाव चाकण रोड वर

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी १०/३९वा

फिर्यादी :- राजकुमार भगवान पवार वय ३२ वर्ष व्यवसाय नोकरी राहणार वाघजाई नगर पवन स्वीट होम बिल्डिंगचे समोर ज्ञानेश्वर साठे बिल्डिंग चौथा मजला खराबवाडी चाकण तालुका खेड

आरोपी :- अज्ञात कंटेनर वरील अज्ञात चालक

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील अज्ञात कंटेनर वरील अज्ञात चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक तळेगाव बाजू कडून शिक्रापूर बाजूकडे घेऊन जात असताना तो भरधाव वेगात हयगयीने,अविचाराने चालवून तळेगाव बाजू कडून शिक्रापूर बाजूकडे जाणारा होंडा शाईन मोटरसायकल नंबर एम एच २६ डी आय ९७२७ ही वरील मोटार सायकल स्वार नामे गजानन भगवान पवार वय २३ वर्ष राहणार वाघजाई नगर चाकण व त्यांचे पाठीमागे बसलेला इसम नामे राजकुमार भगवान पवार ३२ वर्ष यांचे डावे पायास किरकोळ मुक्कामार लागून मोटरसायकलचे नुकसानीस तसेच गजानन भगवान पवार वय २३ वर्षे याचे डोक्यावरून कंटेनर चे पुढील चाक जाऊन त्याचे मृत्युस कारणीभूत झाला म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शेंडकर ८८३००६९२०१

७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- वाकड ९३९/२०२२ भादवि कलम ३६३ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०१/११/२०२२ रोजी सकाळी ०९/०० वाचे सुमारास श्रीनगर, शिवशंभो कॉलनी शनी मंदीर जवळ थेरगाव

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी ०३.५७ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे वय.१६ वर्षे यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि दाभाडे ९८८१२८९४८३

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ९४२/२०२२ भादवि कलम ३६३ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०१/११/२०२२ रोजी १३/०० वा. जय सिंगयांचे बिल्डींगमध्ये, सहकारी कॉलनी नं १ ज्योतिबा नगर काळेवाडी येथून व दि. ०२/११/२०२२ रोजी ११/१० वा. पारी कलेक्शन शगून चौक पिंपरी

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी २२.५३ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्या ०२ अल्पवयीन मुली नामे वय १५ वर्षे व वय १४ वर्षे हयास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि दाभाडे ९८८१२८९४८३

९.

पोस्टे व गु.रजि.नं. :- हिंजवडी १०४८/२०२२ भा.दं.वि. कलम- ४२०, ४०६, ४४८, ५०४, ५०६प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०१/०६/२०१९ रोजी ते आज पावेतो स.नं.२५७/३/१ येथील मुक्ताई पार्क, सनराईज हॉटेलचे मागे, मुकाई नगर, हिंजवडी दि.०१/११/२०२२ रोजी १८/३० रोजी वा श्री साईराम पी जी बावधन

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी २२.३० वा

फिर्यादी :- तातीरेड्डी व्यंकटरमेश, वय-४२ वर्षे, धंदा-शेती व व्यवसाय, रा. फ्लॅट नं. ४०१, टॉवर नं.६, लोधा बेलमोंडो, गहुंजे,

आरोपी :- श्री. नयन अनिलकुमार भयानी, वय-४७ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. फलॅट नं. ३, बिल्डींग नं. ३, फायु स्टार को.हौ.सो. २७ बंडगार्डन रोड, **आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे मुक्ताई पार्क, सनराईज हॉटेलचे मागे, मुकाईनगर, हिंजवडी येथील बी बिल्डींगमधील तिसऱ्या मजल्यावरील उदुमुला लक्ष्मी नरसयया यांच्या हिश्शाचे तातीरेड्डी व्यंकट नरसस्या यांचे फ्लॅट नं. ३०१ व ३०३ व कैपु मधुसुधन रेड्डी यांचे फ्लॅट नं. ३०२ व ३०४, तसेच चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४०१ ते ४०४ आणि पाचव्या मजल्यावरील फलॅट नं. ५०१ ते ५०४ असे फ्लॅट तात्पुरत्या स्वरुपात आरोपी यांना चालविण्यासाठी दिले असता त्यांनी सदरचे फ्लॅट हे फिर्यादी यांना परत केले नाही म्हणुन फिर्यादी त्यांना त्याबाबत विचारणा केली असता आरोपी याने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन दमदाटी केली असुन वर नमुद फ्लॅटचा बेकायदेशीररित्या ताबा घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि देशमुख ९४२००५७१७३

१०.

पोस्टे व गु.रजि.नं. :- भोसरी ८८६ /२०२२ भा.दं.वि. ४०६, ४२० कलम प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- जुन २०२२ रोजी ते दि.१५जुलै २०२२ रोजी चे दरम्यान संगणकिय साधना हॉटेल शिवनेरी पतसंस्था भोसरी

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी २२.१५ वा

फिर्यादी :- विश्वास रामचंद्र काशिद, वय ५१ वर्षे, धंदा नोकरी, रा. निरंकारी कॉलनी, शिवनगरी, गणपती मंदिराशेजार, आदर्शनगर, दिघी, पुणे.

आरोपी :- विनोद शुक्ला नाव सांगत असलेला मो नं. ७९८०७९०७८८ धारक **आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना यातील आरोपीत याने तो आदित्य बिर्ला कॅपिटल फायनान्समध्ये कर्मचारी असल्याचे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांचे आदित्य बिर्ला कॅपिटल

फायनान्समध्ये असलेले रु.१,७१,०००/- रक्कमचे थकीत लोन भरणा करण्याकरीता त्याने पुरविलेल्या बँक खात्यात भरणा करण्यास भाग पाडुन त्यांची फसवणुक केली म्हणुन गुन्हा

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ८८७/२०२२ भा.द.वि.कलम ४०६ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०२/११/२०२२ रोजी १२/३० वा. चे सुमा. बाबर पेट्रोलपंपा समोरून पुणे नाशिक हायवे रोड भोसरी

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी २२.४४ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अनिकेत साहेबराव वाघ वय-३१वर्षे,रा. मु.पो .उपखेडता.चाळीसगाव, जि. जळगाव
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची २०,०००/- रूपये किंमतीची होंडा कंपनीची ॲक्टीवा गाडी एम एच १४ जे एफ ०२७७ हि आरोपी यास विश्वासाने चालविण्यास दिली असता त्याने फिर्यादी यांची दुचाकी परत न करता फिर्यादी यांचा विश्वासघात करुन दुचाकीचा अपहार केला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि केंद्रे९६८९००३५१७

१२.

पोस्टे व गु.रजि.नं. :- शिरगांव परंदवाडी ८०/२०२२ भा.दं.वि. कलम ३२८,२७२,२७३,१८८,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०२/११/२०२२ रोजी ११/४० वा. चे सुमारास कासारसाई पुसाणे रोडने पाचाणे गावचे हददीत मल्हार प्रोव्हिजन स्टोअर्सचे जवळ ता.मावळ

गुन्हा दाखल :- दि.०२/११/२०२२ रोजी २१.५६ वा

फिर्यादी :- समाधान लक्ष्मण फडतरे वय ३० वर्षे पो शि २२४१ नेमणुक शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड

आरोपी :- १)संतोष सोनु कटके वय ४२ वर्षे रा.माळीआळी, घर नं ४५४५, जिजामाता चौक, तळेगाव दाभाडे ता. मावळ
२) शिवाजी सुदाम दरेकर, रा यशवंतनगर, तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे
३) हणुमंत रा खालुंब्रे ता खेड पुर्ण नाव पत्ता माहिती नाही
**आरोपी नं १ व २ अटक**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी नं १ ते ३ यांनी संगणमताने शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखूजन्य पदार्थाचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होऊन शाररिक हानी होऊ शकते हे माहित असतांना देखील १,९९,०६०/- रूपयांचा तंबाखू जन्य गुटखा विक्री करण्याचे हेतूने पोत्यामध्ये भरून ३,५०,०००/- रूपये किंमतीचा पांढरे रंगाची टाटा कंपनीची टाटा एस चारचाकी गाडी नं एमएच १४ एच टी - ०७३३ हिचेमधून ५००/- रूपये किंमतीचा साधा मोबाईल व ८,०००/- रूपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल असा एकुण ५,६१,४१० /- रू किं चा मुद्देमाल हा आरोपी नं ०१ विक्री करता घेवुन आला असताना व आरोपी नं ०२ हा माल जवळ बाळगलेला असताना मिळून आले म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गावीत ९८२३४६१५५५